भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ९.

## उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७.

क्रमांक म.वि.वि.कं.-मिहा-१२१-१८४५-२०१५.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे जिचा उल्लेख " म.वि.वि.कं. " असा करण्यात आला आहे) ही कंपनी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित झाली आहे, व महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. क्र. ३७ वा) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ४० च्या पोट-कलम १(ब) अन्वये, म. वि. वि. कंपनीस नागपूर येथील मल्टी-मॉडेल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (यात यापुढे ज्याचा उल्लेख " मिहान " असा करण्यात आला आहे) च्या ५०२१.२३ हेक्टर अधिसूचित क्षेत्रासाठी, शासन अधिसूचना क्र. टीपीएस २४०१/१४९४/प्र. क्र. २३८/०२/युडी-९, दिनांक ४ फेब्रुवारी २००३ व क्र. टीपीएस २४०१/१४९४/प्र. क्र. २३८/०१/युडी-९, दिनांक २३ जानेवारी, २००६ व क्र. टीपीएस २४०७/२९९७/प्र. क्र. २९६/०७/युडी-९, दिनांक १७ जुलै, २००८ आणि सीआयडी/३३०८/६३०/प्र. क्र. २२४/०८/युडी-१०, दिनांक १ एप्रिल, २०१० अन्वये " विशेष नियोजन प्राधिकरण " म्हणून नियुक्त केले आहे, मिहान अधिसूचित क्षेत्रामध्ये नागपूर जिल्ह्यातील नागपूर शहरी, नागपूर ग्रामीण व हिंगणा तालुक्यातील काही गावांचा समावेश आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) च्या खंड (ड) अन्वये समाविष्ट करण्यात आल्याप्रमाणे, कलम ११५ च्या पोट-कलम (२) नुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने उपरोक्त अधिसूचित क्षेत्राचे सर्वेक्षण करुन विद्यमान भू वापर नकाशा केलेला असून त्याप्रमाणे कंपनीच्या अधिपत्याखाली खालील क्षेत्राच्या जमिनीच्या विकासासाठी प्रारुप प्रस्ताव तयार केला होता.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) च्या खंड (ड) चे उपखंड (२) अन्वये समाविष्ट करण्यात आल्याप्रमाणे, कलम ११५ च्या पोट-कलम (२) द्वारे अधिसूचित क्षेत्राकरीता तयार केलेला प्रारुप नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली (यापुढे ज्याचा उल्लेख " नियोजन प्रस्ताव " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारुपासह शासकीय राजपत्रात व अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जनतेकडून सूचना/हरकती सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग एक-अ, नागपूर विभागीय पुरवणी दिनांक १४ जानेवारी २०१० रोजी पान २, अनुक्रमांक २ वर प्रसिद्ध करण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, जनतेकडून प्राप्त झालेल्या सूचना/हरकतीवर विचारविनिमय करुन म.वि.वि.कंपनीने पत्र क्र. मविविकं-मिहा-१२१-७२७, दिनांक १ जुलै, २०१० अन्वये उक्त प्रारुप नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केली होती.

आणि ज्याअर्थी, सदर नियोजन प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केल्यानंतर काही आनुषंगिक बदल व विविध वापरासाठी जमिनीच्या वाटपातील बदल ही उदभवलेली परिस्थिती आणि शासनाने जारी केलेल्या काही मार्गदर्शक तत्वांमुळे उक्त प्रारुप नियोजन प्रस्तावामध्ये सारभूत बदल करण्याची आवश्यकता आहे असे म.वि.वि.कं. ने महाराष्ट्र शासनाला पत्र क्रं. मविविकं-मिहा-१२१-४६१, दिनांक १७ जून २०१३ द्वारे कळविले होते आणि त्याप्रमाणे शासनाकडे सदर नियोजन प्रस्ताव मागे घेण्याची परवानगी मागितली होती.

आणि ज्याअर्थी, म.वि.वि.कं. च्या संचालक मंडळाने दिनांक ३० जून २०१४ रोजीच्या ठरावाद्वारे उक्त अधिनियमातील तरतूदींचे पालन करुन प्रारुप सुधारीत नियोजन प्रस्ताव आणि विकास नियंत्रण नियमावली पुनःप्रकाशित करण्यासाठी आणि शासनाला पुनःसादर करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उक्त नियोजन प्रस्ताव उक्त अधिनियमाच्या कलम ११५ अनुसार वैधानिक आवश्यकता पूर्ण करण्याकरीता आवश्यक ते बदल समाविष्ट करता यावेत तसेच मान्यतेकरीता तो संचालक, नगर रचना, पुणे यांना पुनःसादर करता यावा म्हणून त्यांचे पत्र क्र. टीपीएस-४१४-४५९-प्र.क्र. २२६-२०१४-नवि-९, दिनांक १४ जानेवारी, २०१५ द्वारे उक्त नियोजन प्रस्ताव मागे घेण्याची म.वि.वि. कंपनीस परवानगी देऊन तो त्या कंपनीकडे परत पाठविला आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) च्या खंड (ड) द्वारे समाविष्ट केलेल्या, कलम ११५ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, अशाप्रकारे सुधारीत केलेले, उक्त क्षेत्रासाठीचा प्रारुप नियोजन प्रस्ताव आणि प्रारुप विकास नियंत्रण नियमावली हे माहितीसाठी आणि महाराष्ट्र शासन राजपत्रात ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. हरकती व सूचना असतील तर त्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.वि.वि. कंपनी मर्यादित यांच्याकडे लेखी स्वरुपात व उपरोक्त पत्त्यावर विनिर्दिष्ट कालावधीत पोहोचतील अशा रितीने पाठविण्यात याव्यात. तो प्रस्ताव संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर उक्त अधिनियमाच्या कलम ४० पोट-कलम (३) च्या खंड (ड) द्वारे समाविष्ट केलेल्या, कलम ११५ च्या पोट-कलम (३) मध्ये समाविष्ट तरतूदीनुसार यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

वरील प्रारुप नियोजन प्रस्तावाची आणि प्रारुप विकास नियंत्रण विनियमाची प्रत जनतेच्या माहितीसाठी खालील ठिकाणी उपलब्ध आहे.—

(१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. (नागपूर), पहिला मजला, सेंट्रल फॅसिलिटी बिल्डिंग, मिहान-सेझ, खापरी (रेल्वे), नागपूर-४४१ १०८. फॅक्स-९१-७१०४-६६५६००, दूरध्वनी-९१-७१०४-६६५६६५.

(२) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., मुंबई, ८ वा मजला, सेन्टर-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

(३) उपसंचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, नागपूर डिव्हीजन, नागपूर, १ ला मजला, जुनी सेक्रेटरियट बिल्डिंग, गेट नं. २, नागपूर.

(४) महापालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.

(५) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, स्टेशन रोड, सदर, नागपूर-४४० ००१.

संचालक मंडळ, म. वि. वि. कं. यांच्या आदेशानुसार,

तानाजी सत्रे,
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई.

मुंबई :
दिनांक १८ फेब्रुवारी २०१५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १०.

## BY VICE-CHAIRMAN AND MANAGING DIRECTOR

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 (MAH. XXXXVZ OF 1966),

No. MADC-MIHA-121-1845-2015.—

Whereas, the Maharashtra Airport Development Company Limited (hereinafter referred to "MADC") is a company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra;

And whereas, Government of Maharashtra in Urban Development Department has, in exercise of its power conferred under sub-section (*1B*) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Government Notification Nos. TPS-2401-1494-CR-238-02-UD-9, dated 04-02-03, TPS-2401-1494-CR-238-01-UD-9, dated 23-01-06, TPS-2407-2997-CR-296-07-UD-9, dated 17-07-08 and CID-3308-630-CR-224-08-UD-10, dated 01-04-2010, appointed MADC to be the Special Planning Authority for the notified area of Multi-modal International Hub Airport at Nagpur (hereinafter referred to as "MIHAN"); admeasuring 5021.23 Ha. and comprises area from villages of Nagpur Urban Taluka, Nagpur Rural Taluka & Hingna Taluka of Nagpur District ;

And whereas, MADC had in accordance with sub-section (*2*) of Section 115 as inserted by clause (*d*) of sub-section (*3*) of Section 40 of the said Act carried out survey of the aforesaid notified area and prepared the existing land use map and accordingly prepared the Draft Proposals for the development of land within its jurisdiction ;

And whereas, MADC, as required by sub-section (*2*) of Section 115 as inserted by clause (*d*) of sub-section (*3*) of Section 40 of the said Act had published the Draft Planning Proposals along with Draft Development Control Regulations (hereinafter referred as "the Planning Proposal") in the Maharashtra Government Gazette Part-I-A, Nagpur Divisional Supplement, dated 14th January 2010 on page 3, at serial No. 3, for inviting suggestions and objections from the public within a period of 30 days from the date of publication of the notice in the official Gazette;

And whereas, after considering the suggestion and objection so received from the public, MADC had submitted the Planning Proposal to the State Government *vide* its letter No. MADC-MIHA-121-727, dated 1st July, 2010 for sanction;

And whereas, after submission of the Planning Proposal to the State Government, MADC, *vide* its letter No. MADC-MIHA-121-461, dated 17th June, 2013 had informed the State Government that on account of some incidental changes/circumstances arisen in the allocation of land for different uses and guidelines issued by the Government, the said Planning Proposal needs to undergo changes/modifications of substantial nature and as such, requested the Government to allow MADC to withdraw the said Planning Proposal;

And whereas, the Board of Directors of MADC, *vide* Resolution dated 30th June, 2014 has approved the draft revised Planning Proposal and Development Control Regulations for republishing and resubmitting to the Government after following the due process under the said Act;

And whereas, the Government of Maharashtra has *vide* its letter No. TPS-2414-459-CR-226-2014-UD-9, dated 14th January 2015 returned the said Planning Proposal to MADC permitting it to withdraw the said Planning Proposals, so as to incorporate the necessary changes and to carry out the statutory requirements as per Section 115 of the said Act and resubmit the same to Director, Town Planning, Pune for approval.

Now, therefore, as required by sub-section (*2*) of Section 115 as inserted by clause (*d*) of sub-section (*3*) of Section 40 of the said Act, the Draft Planning Proposal and Draft Development Control Regulations for the said area, so revised are hereby published, for information and inviting suggestions and objections thereto within a period of 30 days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. The suggestions and objecitons, if any, should be sent in writing and addressed to Vice-Chairman & Managing Director, MADC Ltd., on the above address, so as to reach within stipulated period. The suggestions/objections received during stipulated period will be duly processed in accordance with the law embodied in sub-section (*3*) of Section 115 as inserted by clause (*d*) of sub-section (*3*) of Section 40 of the said Act, before submitting the proposal to the Director, Town Planning, Maharashtra State, Pune for approval.

A Copy of above Draft Planning Proposals and Draft Development Control Regulations is kept open for inspection of the public at following offices.—

(1) Maharashtra Airport Development Company Limited, Nagpur, 1st Floor, Central Facility Building, MIHAN-SEZ, Khapari (Rly.), Nagpur-441 108. Fax : 91-7104-665600, Phone : 91-7104-665665.

(2) Maharashtra Airport Development Company Limited, Mumbai, 8th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400 005.

(3) Deputy Director, Town Planning and Valuation Department, Nagpur Division, Nagpur, 1st Floor, Old Secretariat Building, Gate No. 2, Nagpur.

(4) Municipal Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.

(5) Chairman, Nagpur Improvement Trust, Station Road, Sadar, Nagpur- 440 001.

By order of the Board of Directors, MADC,

TANAJI SATRE,
Vice-Chairman and Managing Director,
Maharashtra Airport Development Company Limited,
Mumbai.

Mumbai :
Dated the 18th February 2015.